# University of Mumbai

अत्यंत तातडीचे

स्मरणपत्र –३

प्रकाशन विभाग
कक्ष क्र. २२१,
प्र.वि./आयसीडी/२०१९–२०/
दिनांक :–25 जुलै, २०१९.

विषय:– विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०१५–१६, २०१६–१७, २०१७–१८ आणि २०१८–१९ या चार वर्षांचे वर्षवृत्त तयार करण्यासाठी वर्षनिहाय स्वतंत्रपणे माहिती पाठविण्याबाबत.

संदर्भ :– १. परिपत्रक क. प्र.वि./आयसीडी/२०१८–१९/११७ दि. १८ मार्च, २०१९
२. परिपत्रक क. प्र.वि./आयसीडी/२०१८–१९/ दि. २१ मे, २०१९
३. परिपत्रक क. प्र.वि./आयसीडी/२०१९–२०/६१ दि. २१ मे, २०१९

महोदय/ महोदया,

या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकानुसार आपणास कळविण्यात येते की, वरील परिपत्रकाद्वारे मागविलेली माहिती आपण अद्याप पाठविलेली नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६– कलम १३६(१) व १३६(२) नुसार विद्यापीठाचा मराठी व इंग्रजी मधील अहवाल विधान मंडळाच्या सभागृहापुढे सादर करावयाचा असल्यामुळे आपल्याकडून आवश्यक असलेली विभागाची माहिती दि. ३१ जुलै, २०१९ पर्यत फक्त ई–मेल द्वारे पाठविण्यात यावी.

दिनांक ३१ जुलै, २०१९ नंतर कोणत्याही माहितीचा वर्षवृत्तामध्ये समावेश केला जाणार नाही व सदर माहिती पाठविण्यास आपण उत्सूक नाही असे समजण्यात येईल व त्याची सर्व जबाबदारी प्राचार्य/संचालक व संबंधित संस्थावर राहिल. याबाबत काळजीपुर्वक नोंद घेण्यात यावी.

**हे पत्र अत्यंत तातडीचे समजावे.**

**(सोबत:– परिपत्रक क्र प्र.वि./आयसीडी/२०१८–१९ दि. १८ मार्च, २०१९ चे अवलोकन करावे)**

टिप:–

१. माहिती फक्त ई–मेल द्वारे स्वीकारण्यात येईल. त्यासाठीचा ई–मेल आयडी पुढीलप्रमाणे :– **fortpublication@gmail.com**

२. माहिती पाठवितांना मराठी साठी– कृतीदेव ५०, Font size– १८ व इंग्रजीसाठी Times New Roman, Font size– १४ Word File मध्ये पाठवावी.
३. माहिती पाठवितांना त्या– त्या शैक्षणिक वर्षांचा ठळकपणे उल्लेख करण्यात यावा.
४. कृपया माहिती दिनांक ३१ जुलै, २०१९ पर्यंत पाठवावी. (माहिती फक्त ई–मेलद्वारे स्वीकारण्यात येईल कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी)
५. सदर परिपत्रक (प्र.वि./आयसीडी/२०१८–१९/११७ दि. १८ मार्च, २०१९) मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in – या संकेतस्थळावरील Circular Link अंतर्गत Publication Section येथे उपलब्ध करून देण्यात आले आहे.
६. वर्षवृत्ताची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य/मान्यता प्राप्त संस्थाचे प्रमुख यांनी या अगोदर पाठविली असल्यास हे स्मरणपत्र विचारात घेऊ नये.

प्रत माहितीसाठी अग्रेषित:–,

७. मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/ मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक

मुंबई– ४०० ०३२
दि.२५, जुलै २०१९

डॉ. अजय देशमुख
(कुलसचिव)